■ वर्ष- १२ ■ अंक- ४० ■ मुंबई, मंगळवार,१८ ऑगस्ट २०२६ ते २४ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

PG|2

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

शिवाजी महाराजांचं चित्र असलेली भारतीय संविधानाची हस्तलिखित प्रत, आजही अशा प्रकारे केली जात आहे जतन

3 → रडीचा डाव

सीबीआयची नीट पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

निजामपुरा पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने बेकायदेशीर मटका जुगार फोफावत आहे

भिवंडी : भिवंडी परिसरातील निजामपुरा पोलीस प्रशासनाच्या आशीवार्दाने शिवाजी चौक खाडीपार ब्रिज अलीकडे सर्विस सेंटर लगत काळ्या रंगाच्या गेटच्या आत मोठ्या प्रमाणात अवैध मटका जुगार व पत्त्यांचा जुगार निजामपुरा पोलीस प्रशासनाच्या आशीवार्दाने सर्रासपणे चालविला जात आहे. भिवंडी परिसरात अवैध मटका व जुगार सुरू असल्याच्या तक्रारींवर स्थानिक पोलीस वेळोवेळी छापे टाकून कारवाई करतात. असे असले तरी काही भागात पोलिसांच्या दुर्लक्षामुळे किंवा आशीर्वादाने हे धंदे सुरू असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जातो. बेकायदेशीर जुगाराविरुद्ध पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे असते. अवैध जुगाराची स्थितीकार शांतीनगर, नारपोली व कोनगाव परिसरात पोलिसांनी यापूर्वी जुगार अड्डयांवर छापे टाकून कारवाई केली आहे. स्थानिक पातळीवर पोलिसांच्या भूमिकेविषयी नागरिकांमध्ये नाराजी असते. नागरिकांची मागणी कडक कार्रवाइ करा अड्डयांवर तात्काळ छापे टाकावेत. पारदर्शकता ठेवावी दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवरही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे. पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे किंवा आशीर्वादाने अनेक भागांत अवैध मटका आणि जुगार सुरू असल्याच्या तक्रारवजा घटना समोर येतात. अशाप्रकारच्या बेकायदेशीर धंद्यांवर वेळोवेळी धाडी टाकून कारवाई केली जाते, परंतु स्थानिक स्तरावर हे प्रकार पुन्हा डोके वर काढतात. अवैध जुगार आणि कारवाईची स्थितीस्थानिक आक्षेपः अनेक शहरांमध्ये पोलिसांच्या हद्दीत किंवा पोलीस ठाण्यांच्या जवळच असे अवैध धंदे चालत असल्याचा आरोप नागरिकांकडून व समाजसेवकांकडून केला जातो.पोलिसांची कारवाईः गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा किंवा विशेष पथकांकडून छापे टाकून मटका चालकांना व जुगार खेळणाऱ्यांना ताब्यात घेतले जाते. गुन्हेगारीत वाढः अवैध मटका, जुगार आणि गांजासारख्या गोष्टींमुळे परिसरातील गुन्हेगारी वाढते, ज्यावर कडक कारवाईचे आदेश वरिष्ठांकडून दिले जातात.प्रतिबंधक उपायबेकायदेशीर धंदे रोखण्यासाठी नागरिकांनी अशा गैरप्रकारांची माहिती



थेट वरिष्ठांकडे किंवा नियंत्रण कक्षाला देणे गरजेचे असते.दोषी आढळणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर किंवा अधिकाऱ्यांवरही प्रशासनाकडून निलंबनाची कारवाई केली जाते. भिवंडी नवनियुक्त पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांनी पदभार हातात घेताच अहोरात्र चालणाऱ्या डान्सबार यांच्यावर धडक कार्रवाई करून परिमंडळ दोन मध्ये वचक निर्माण करून शांतता राबवण्यात आली पण ह्याच परिमंडळ विभागामध्ये निजामपूराच्या हद्दीत चालू असणाऱ्या मटका जुगार एक नाही दोन नाही तर तीन ठिकाणी दिवस-रात्र अवैध मटका जुगार पत्त्यांच्या जुगाराकडे पोलिस उपआयुक्त दुर्लक्ष न करता सदर जुगारावर जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार कार्रवाई करून इतर जुगारावरती आळा घालण्यात यावा .

अवैध मटका, जुगार किंवा इतर बेकायदेशीर धंदे सुरू असल्याचा संशय किंवा तक्रार असल्यास, नागरिकांनी थेट संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकारी, परिमंडल उपायुक्त (ऊउढ) किंवा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे लिखित तक्रार करावी.पोलीस प्रशासनातील कोणत्याही कर्मचाऱ्याचे किंवा अधिकाऱ्याचे अशा अवैध धंद्यांना अभय किंवा आशिर्वाद असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर व खात्यांतर्गत कडक कारवाई केली जाते.तक्रार कुठे करावी?



पोलीस कंट्रोल रूमः आपत्कालीन किंवा तात्काळ मदतीसाठी थेट पोलिसांच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

वरिष्ठ अधिकारीः स्थानिक पोलीस ठाण्याच्या कारभाराबाबत शंका असल्यास थेट जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक (रढ) किंवा अपर पोलीस आयुक्तांकडे दाद मागता येते.

भ्रष्टाचार तक्रारः पोलीस अधिकारी किंवा अंमलदार लाच घेत असल्याच सिद्ध झाल्यास 'लाचलुचपत प्रतिबंधक विभागात' (अउइ) तक्रार नोंदवता येते.

नंदुरबारच्या नराधमाचे भयानक कृत्य

53 बालकांवर अत्याचार, 649 व्हिडिओ आणि 1000 पेक्षा अधिक फोटो



नंदुरबार। नंदुरबारमध्ये महाराष्ट्राला हादरवणारी घटना घडली आहे. नंदुरबार शहरात अल्पवयीन बालकांवरील अत्याचाराचा अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या चार वर्षांपासून हा प्रकार सुरू असल्याचा आरोप असून, पोलिसांनी स्वतःहून सुमोटो गुन्हा दाखल करत केलेल्या तपासात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. तब्बल 53 बालकांवर अत्याचार झाल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीकडून 649 पेक्षा अधिक व्हिडिओ क्लिप्स आणि 1000 हून अधिक फोटो पोलिसांनी जप्त केले आहेत.

नंदुरबार शहरात समोर आलेल्या या धक्कादायक प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. गेल्या चार वर्षांपासून अल्पवयीन बालकांवर शारीरिक अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या संशयित आरोपीला नंदुरबार पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात कोणतीही तक्रार समोर न आल्याने पोलिसांनी स्वतःहून सुमोटो गुन्हा दाखल करत तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान आरोपीकडून मोठ्या प्रमाणात डिजिटल पुरावे पोलिसांच्या हाती लागले आहेत.

दरम्यान, आरोपीकडून आणखी काही व्हिडिओ आणि फोटो मिळण्याची शक्यता पोलिस प्रशासनाने व्यक्त केली आहे. पोलिस कस्टडीत असलेल्या आरोपीची सखोल चौकशी केली जात असून, या प्रकरणात आणखी काही पीडित समोर येतात का, याचा तपास केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एका व्यक्तीच्या या कथित कृत्यामागे असलेली मानसिक विकृती आणि त्याचे सामाजिक परिणाम याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. एकीकडे पोलिसांकडून या प्रकरणातील डिजिटल पुराव्यांची तपासणी सुरू आहे, तर दुसरीकडे या पुराव्यांच्या आधारे आणखी किती पीडितांची ओळख समोर येते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे नंदुरबारातील या धक्कादायक प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जाईल, तसतसे आणखी गंभीर खुलासे होण्याची शक्यता आहे.


'हे म्हणजे डास मारण्यासाठी तलवारीचा वापर' हायकोर्टाने एफडीएला फटकारलं



मुंबई। जगप्रसिद्ध ऑनलाइन शॉपिंग कंपनीची भारतातील उपकंपनी असलेल्या 'ॲमेझॉन रिटेल इंडिया' विरुद्धच्या कारवाईवरून मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी पुन्हा एकदा आयुक्त तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या अन्न व औषध प्रशासनावर (एफडीए) टीका केली. तुम्ही तुमची धोरणे आक्रमकपणे राबवण्याच्या नादात थेट परवाना रद्द करण्याची कारवाई करत आहात. हे म्हणजे डास मारण्यासाठी चक्क तलवारीचा वापर करण्यासारखे असल्याची टिप्पणी न्यायालयाने केली व अशा कार्यवाहीमागील कारणे स्पष्ट करण्याचे आदेश 'एफडीए'ला दिले.

कठोर कारवाईची गरज नसलेली समस्या सोडवण्यासाठी 'एफडीए' आपली धोरणे अतिउत्साहाने राबवण्याचा प्रयत्न करत आहे, असे सुनावताना पद्धतशीरपणे काम करण्याचा सल्ला प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने 'एफडीए'ला दिला. नियम उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केल्याबद्दल न्यायालयाने त्यांचे कौतुकही केले. परंतु या परिस्थितीचा सामना करण्यासाठी ते सर्व व्यावसायिक आस्थापने बंद करणार आहेत का, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला. मुदत संपलेले अन्नपदार्थ वैज्ञानिक पद्धतीने नष्ट करण्याऐवजी किरकोळ बाजारात पाठवल्याच्या आरोपावरून 'एफडीए'ने भिवंडीतील गोदामावर केलेल्या कारवाईविरोधात 'ॲमेझॉन रिटेल इंडिया'ने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर झालेल्या सुनावणीच्या वेळी, प्रस्थापित कायद्यानुसार, निलंबनाविरुद्धचे अपील प्रलंबित असताना अन्न परवाना रद्द केला जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने 'एफडीए'ला सुनावले. 3 दिवसांत 10 हॉटेलवर कारवाई

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) 4 ते 6 ऑगस्ट या तीन दिवसांत राज्यातील 10 हॉटेलवर कारवाई करत त्यातील चौघांचे परवाने निलंबित केले आहेत. तसेच 5 आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याची नोटीस देण्यात आली असून एका आस्थापनेस सुधारणा नोटीस बजावली आहे. दादर पश्चिमेकडील 'ईट निनो', अंधेरीतील 'जय माँ काली', सांताक्रुझ येथील 'हाऊस ऑफ महाराष्ट्र', कुर्ला येथील 'साऊथ इंडिया डोसा कॉर्नर'मध्ये स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याप्रकरणी या उपाहारगृहांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. प्रभादेवी येथील मारूश हॉटेल, वांद्रे पश्चिमेकडील छत्रधार कॅटरर्स, शिवाजी नगर येथील विजयदीप महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था आणि आयआयटी मुंबईतील दोन उपाहारगृहांकडे परवाना नसल्याने त्यांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच अन्नपूर्णा कॅटरिंग सर्व्हिसला सुधारणा नोटीस बजावण्यात आली. दरम्यान, अन्नपदार्थाच्या दजार्बाबत शंका येताच नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा. तक्रार करतेवेळी स्वतःचे नाव व पत्ता/संपर्क क्रमांक, संबंधित आस्थापनेचा पत्ता व भेसळीची माहिती तक्रारीत नमूद करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.




पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,१८ ऑगस्ट २०२६ ते २४ ऑगस्ट २०२६

शिवाजी महाराजांचं चित्र असलेली भारतीय संविधानाची हस्तलिखित प्रत, आजही अशा प्रकारे केली जात आहे जतन





राज्यघटनेच्या दोन्ही हस्तलिखित प्रती सध्या संसदेच्या ग्रंथालयात एका सीलबंद काचेच्या पेटीत जतन करून ठेवल्या आहेत. भारतीय संविधानाचा विषय जेव्हाही निघतो तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान सभेचा उल्लेख नेहमीच केला जातो.

पण फार कमी लोकांना हे माहिती आहे की, संविधानाच्या पहिल्या अधिकृत प्रती या हस्तलिखित होत्या आणि त्या भारताचा इतिहास आणि संस्कृतीचं दर्शन घडवणाऱ्या चित्रांनी सजवलेल्या होत्या.

या चित्रांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते महात्मा गांधींपर्यंत अनेक ऐतिहासिक व्यक्तींचा समावेश आहे.

भारताचं संविधान तयार करण्यासाठी 2 वर्षे, 11 महिने आणि 18 दिवसांचा कालावधी लागला. भारताचं हे संविधान 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेकडून स्वीकारण्यात आलं आणि 26 जानेवारी 1950 रोजी ते अंमलात आलं.

राज्यघटनेच्या स्वीकृतीनंतर त्याच्या पहिल्या दोन प्रती हस्तलिखित होत्या. एक प्रत इंग्रजीमध्ये आणि एक हिंदीमध्ये लिहिलेली होती.

भारताची राज्यघटना ही जगातील सर्वात लांब हस्तलिखित राज्यघटना असून, ती एकूण 221 पानांची आहे.

संविधानाच्या हस्तलिखित प्रती कुणाकडे होत्या?, त्यांची मांडणी आणि सजावट कुणी केली? या हस्तलिखित प्रती सध्या कुठे उपलब्ध आहेत? आणि त्यांचं जतन करण्यासाठी कोणते विशेष प्रयत्न केले जातात? हे आपण जाणून घेणार आहोत.

संविधान हातानं लिहिण्याची कल्पना कशी सुचली?

भारतीय संसदेच्या A Brief Note on the Calligraphy of the Constitution of India in English and Hindi' या अधिकृत दस्तऐवजानुसार, ही सूचना संविधान सभेचे सदस्य प्रा. के. टी. शाह यांनी केली होती.

भारतीय संविधान 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारण्यात आलं. पण त्याच्या काही दिवसांपूर्वीच संविधान हस्तलिखित सुलेखन, सुंदर चित्रांनी सजवलेलं आणि मुद्रित असावं अशी कल्पना सुचवण्यात आली होती.

भारतीय संविधान 26 जानेवारी 1950 रोजीच लागू होणार असल्यानं, त्यातील सुलेखनाचं काम किमान 20 जानेवारी 1950 पर्यंत पूर्ण करावं आणि रंगकाम संविधान लागू झाल्यानंतरही पूर्ण करता येईल, असं ठरवण्यात आलं.

पुढचा प्रश्न असा होता की, भारताच्या या अधिकृत संविधानाचं सुलेखन कोण करणार आणि ते कोण रंगवणार?

संविधान लिहिणारे कलाकार कोण होते?

प्रा. के. टी. शाह यांच्या सूचनेनंतर, ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यासाठी कलाकारांचा शोध सुरू झाला.

भारत सरकारच्या 'भारताच्या संविधानातील कला आणि सुलेखन' या अधिकृत दस्तऐवजानुसार, संविधानाची इंग्रजी प्रत लिहिण्याची जबाबदारी प्रेम बिहारी नारायण रायजादा यांच्यावर सोपवण्यात आली होती. तर हिंदी प्रत लिहिण्यासाठी वसंत के. वैद्य यांची निवड करण्यात आली होती.

प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी संविधानाच्या प्रत्येक पानावर आपलं नाव लिहावं अशी मागणी केली होती. घटना समितीनं ती मान्य केली.

भारतीय संविधानाची इंग्रजीतील हस्तलिखित







प्रत प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी तयार केली होती. भारतीय संविधानाची इंग्रजीतील हस्तलिखित प्रत प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी तयार केली होती.

त्यामुळं संविधानाच्या इंग्रजी प्रतीच्या प्रत्येक पानाच्या तळाशी पाहिल्यास, एका कोपऱ्यात इंग्रजीमध्ये 'PREM' असं लिहिलेलं दिसून येईल.

सुलेखन कोण करणार हे स्पष्ट झालं तरी त्यातील चित्रांचा प्रश्न अजूनही अनुत्तरित होता.

भारतीय संसदेच्या दस्तऐवजानुसार, संविधान सभेचे अध्यक्ष कृष्ण कृपलानी यांच्या सांगण्यावरून, डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी पश्चिम बंगालमधील शांतिनिकेतन कला भवनचे प्रमुख नंदलाल बोस यांना एक पत्र लिहिलं.

डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या विनंतीवरून, नंदलाल बोस यांनी संविधानाची हस्तलिखित प्रत रंगवण्यास सहमती दर्शवली.

भारतीय संविधानातील चित्रकलेच्या कामासाठी कलाकार नंदलाल बोस यांच्याशी संपर्क साधण्यात आला.

वेळ कमी असल्यानं, सुलेखनानं (हस्तलेखनानं) सुरुवात करण्याचं ठरलं, पण प्रत्येक पानावर चित्रांसाठी जागा सोडण्यात आली.

28 नोव्हेंबर 1949 रोजी, प्रेम बिहारी नारायण रायजादा संविधान सभेच्या कार्यालयात बसले आणि त्यांनी संविधानाची इंग्रजी प्रत हाताने लिहायला सुरुवात केली. एप्रिल 1950 च्या शेवटच्या आठवड्यापर्यंत हे काम पूर्ण झाले.

रायजादांनी संविधानाची काही पानं हातानं लिहिल्यावर, ती पानं शांतिनिकेतनला पाठवण्यात आली. तिथं कलाकारांनी त्यावर चित्रं काढली.

नंदलाल बोस यांनी त्यांचे शिष्य बेओहर राममनोहर सिन्हा आणि शांतिनिकेतनशी संबंधित इतर कलाकारांच्या मदतीने संविधानाच्या हस्तलिखित प्रतीसाठी चित्रांचं नियोजन करण्यास सुरुवात केली.

बेओहर राममनोहर सिन्हा यांच्यासह शांतिनिकेतनशी संबंधित इतर अनेक कलाकारांनी संविधानाच्या हस्तलिखित प्रती रंगवल्या.

बेओहर राममनोहर सिन्हा यांच्यासह शांतिनिकेतनशी संबंधित इतर अनेक कलाकारांनी संविधानाच्या हस्तलिखित प्रती रंगवल्या.

भारत सरकारच्या 'भारताच्या संविधानातील कला आणि सुलेखन' या अधिकृत दस्तऐवजानुसार, नंदलाल बोस आणि बेओहर राममनोहर सिन्हा यांच्या व्यतिरिक्त, दीनानाथ भार्गव, विनायक शिवराम मासोजी, बिस्वरूप बोस, ए. पेरुमल, निबेदिता बोस, अमला सरकार, धीरेंद्र कृष्णा देब बर्मन, गाणे जाम भजना, जगतल, कृष्णा, जाम बुरमन, विनायक शिवराम मासोजी पटेल, रजनीकांत, किरपाल सिंग शेखावत आणि सुमित्रा नारायण यांनीही राज्यघटनेच्या प्रतीमध्ये कलाकुसर करण्याच्या कामात योगदान दिलं.

संविधानावर काढलेल्या प्रत्येक चित्रावर ती प्रतिमा तयार करणाऱ्या कलाकाराची स्वाक्षरी दिसून येते.

भारतीय संसदेच्या अधिकृत दस्तऐवजानुसार, जेव्हा 26 जानेवारी 1950 रोजी देशाचं संविधान लागू झालं, तेव्हा संविधानाच्या हस्तलिखित इंग्रजी प्रतीची केवळ 99 पाने तयार झाली होती. त्यापैकी फक्त 15 पानांवरील कलाकुसर पूर्ण झाली होती, तर 70 पानं शांतिनिकेतनमध्ये नंदलाल बोस यांच्याकडे उपलब्ध होती.

इंग्रजी प्रतीच्या सुलेखनाचं काम पूर्ण होण्यास सुमारे पाच महिने लागले, तर चित्रांच्या कामाला त्याहून थोडा जास्त वेळ लागला.

कोरीव काम करण्याचं महत्त्व काय आहे?

राज्यघटनेच्या हस्तलिखित प्रतींमधील चित्रे केवळ सजावटीसाठी नव्हती, तर त्यातून भारताचा इतिहास, संस्कृती आणि स्वातंत्र्यलढा यांचंही चित्रण होणार होतं.

भारतीय संविधान स्वीकारण्यात आलं, तेव्हा त्यात 395 कलमं, 22 भाग आणि 8 अनुसूची होत्या.

नंदलाल बोस आणि त्यांच्या टीमनं संविधानाच्या मूळ 22 भागांशी संबंधित 22 मुख्य प्रतिमा तयार केल्या.

संविधानाच्या पहिल्या पानावर अशोक स्तंभाचे सिंहचिन्ह आहे, जे कलाकार दीनानाथ भार्गव यांनी डिझाइन केले होते.

त्यातील प्रत्येक प्रतिमा ही अगदी मोहेंजो-दडो काळापासून स्वातंत्र्यापर्यंत, भारताची कहाणी सांगणारी आहे.

संविधानाच्या पहिल्या पानावर देशाचं राष्ट्रचिन्ह, 'अशोक स्तंभावरील सिंहचिन्ह' आणि त्याखाली 'सत्यमेव जयते' ही राष्ट्रीय घोषणा लिहिलेली आहे. ही प्रतिमा दीनानाथ भार्गव यांनी डिझाइन केली आहे.

दुसऱ्या पानावर कलाकार बेओहर राममनोहर सिन्हा यांनी डिझाइन केलेली संविधानाची प्रस्तावना आहे.


त्याच्या सभोवतालच्या बॉर्डरच्या प्रत्येक कोपऱ्यात अशोक स्तंभाचे चार प्राणी म्हणजेच बैल, हत्ती, घोडा आणि सिंह यांचं चित्रण केलेलं आहे.

या पानाच्या वरच्या दोन कोपऱ्यांमध्ये बैल आणि हत्ती, तर खालच्या दोन कोपऱ्यांमध्ये घोडा आणि सिंह चित्रित केले आहेत.

या पानाच्या वरच्या दोन कोपऱ्यांमध्ये बैल आणि हत्ती, तर खालच्या दोन कोपऱ्यांमध्ये घोडा आणि सिंह चित्रित केले आहेत.

यानंतर संविधानाचे 22 भाग सुरू होतात. ही 22 चित्रं मोहेंजो-दडो कालखंड, वैदिक कालखंड, महाकाव्य कालखंड, महाजनपद आणि नंद कालखंड, मौर्य कालखंड, गुप्त कालखंड, मध्ययुगीन कालखंड, मुघल कालखंड, ब्रिटिश





कालखंड आणि भारताच्या स्वातंत्र्याचा लढा यांचं चित्रण करतात.

उदाहरणार्थ, मूलभूत हक्कांचं वर्णन करणाऱ्या तिसऱ्या विभागात, रामायणापासून प्रेरित एक चित्र आहे. त्यामध्ये राम, लक्ष्मण आणि सीता यांचं चित्रण आहे. हे चित्र जमुना सेन यांनी तयार केलेलं आहे.

हे चित्र रामायणापासून प्रेरित असल्याचे म्हटले जाते.

मार्गदर्शक तत्त्वांचं वर्णन करणाऱ्या चौथ्या विभागामध्ये महाभारतापासून प्रेरित एक चित्र आहे. त्यामध्ये कृष्ण अजुर्नाला उपदेश करताना दाखवलेलं आहे. हे चित्र बाणी पटेल, नंदलाल बोस आणि विनायक शिवराम मासोजी यांनी तयार केलं होतं.

याव्यतिरिक्त, महात्मा बुद्धांनी ज्ञानप्राप्तीनंतर दिलेला पहिला उपदेश, नालंदा विद्यापीठ, नटराज आणि स्वस्तिक ही चिन्हं चित्रित करण्यात आली आहेत.

मुघल साम्राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी अकबराच्या दरबाराचंही चित्र साकारण्यात आलं आहे.

राज्यघटनेच्या या पानावर बुद्ध ज्ञानप्राप्तीनंतर पहिला उपदेश देतानाचे चित्रण आहे. संविधानाच्या 15 व्या भागामध्ये निवडणुकांशी संबंधित कायद्यांचं वर्णन आहे. त्या पानावर छत्रपती शिवाजी महाराज आणि गुरु गोविंद सिंगजी यांचं चित्र आहे.

या चित्रात छत्रपती शिवाजी महाराज आणि गुरु गोविंद सिंगजी यांच्या ऐतिहासिक कामगिरीचं चित्रण करण्यात आलं आहे. या पृष्ठावरील चित्रं धीरेंद्र कृष्ण देब बर्मन, नंद लाल बोस आणि किरपाल सिंग शेखावत यांनी काढलेली आहेत.

या चित्रामध्ये छत्रपती शिवाजी आणि गुरु गोविंद सिंगजी यांचा ऐतिहासिक वारसा चित्रित केला आहे.

या चित्रामध्ये छत्रपती शिवाजी आणि गुरु गोविंद सिंगजी यांचा ऐतिहासिक वारसा चित्रित केला आहे.

याशिवाय महाराणी लक्ष्मीबाई, टिपू सुलतान, महात्मा गांधींचा दांडी मार्च आणि सुभाषचंद्र बोस यांची चित्रंही दिसतात.

भारताचे भौगोलिक स्थान स्पष्ट करण्यासाठी, हिमालयापासून वाळवंट आणि महासागरांपर्यंतच्या प्रतिमांचाही समावेश करण्यात आला आहे.

संविधानाच्या 17 व्या कलमात कलाकार बनी पटेल आणि नंदलाल बोस यांनी साकारलेले गांधींच्या दांडी मार्चचं चित्र आहे.

हस्तलिखित संविधानाचं जतन

सध्या, भारतीय संविधानाच्या इंग्रजी आणि हिंदी हस्तलिखित प्रती नवी दिल्लीतील संसदेच्या ग्रंथालयात ठेवल्या आहेत.

खास तयार केलेल्या सीलबंद काचेच्या पेट्यांमध्ये त्या ठेवल्या आहेत. या पेट्या नायट्रोजन वायूने भरलेल्या असतात आणि त्यात ऑक्सिजन उपलब्ध नसतो.

ऑक्सिजन नसल्यामुळे संविधानाच्या कागदपत्रांची ऑक्सिडेशन प्रक्रिया थांबवता येते.

भारतीय संविधानाच्या हस्तलिखित प्रतींचं योग्य प्रकारे जतन करण्यासंबंधीची काळजी 1980 च्या दशकाच्या मध्यात सुरू झाली होती. तोपर्यंत त्या हस्तलिखित प्रती 30 वर्षांहून अधिक जुन्या झाल्या होत्या. अशा परिस्थितीत, त्यांचं जतन करणं आवश्यक झालं होतं.

संविधानाच्या हस्तलिखित प्रती नायट्रोजनने भरलेल्या एका सीलबंद काचेच्या पेटीत ठेवल्या आहेत.

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेनुसार, संविधानाच्या हस्तलिखित प्रतींच्या जतनासाठी संसद ग्रंथालयानं सर्वप्रथम राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळेशी संपर्क साधला होता.

1988 ते 1989 या काळात राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळेत अनेक प्रयोग करण्यात आले. परंतु, काही तांत्रिक त्रुटींमुळे यश मिळू शकलं नाही. त्यानंतर अनेक परदेशी संस्थांकडूनही सल्ला घेण्यात आला. अखेरीस, जुलै 1993 मध्ये, नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीने अमेरिकेतील गेटी कॉन्झर्व्हेशन इन्स्टिट्यूटसोबत भारतीय संविधानाच्या इंग्रजी आणि हिंदी हस्तलिखित प्रतीसाठी दोन स्वतंत्र हवाबंद पेट्या बनवण्याकरिता एका करारावर स्वाक्षरी केली.

गेटी कॉन्झर्वेशन इन्स्टिट्यूटनं दिलेल्या माहितीनुसार, या पेट्यांमध्ये हवा प्रवेश करू शकत नाही. संविधानाच्या प्रती जतन करण्यासाठी, या पेट्या नायट्रोजन वायूनं भरल्या जातात आणि त्यात एक टक्क्यापेक्षा कमी ऑक्सिजन असेल याची खात्री केली जाते.

मिळालेल्या माहितीनुसार, या बॉक्समध्ये एक असं उपकरण बसवण्यात आलं आहे, जे बॉक्समधील ऑक्सिजनचं प्रमाण एक टक्क्यापेक्षा जास्त होणार नाही याची खात्री करण्यासाठी ऑक्सिजनच्या प्रमाणावर सतत लक्ष ठेवतं.

अमेरिकेतील गेटी कॉन्झर्व्हेशन इन्स्टिट्यूटने तयार केलेल्या या पेट्या मार्च 1994 मध्ये भारतीय संसदेला सुपूर्द करण्यात आल्या. या पेट्या ठेवण्यासाठी संसद ग्रंथालयात एक विशेष खोली बांधण्यात आली आहे. तिचं तापमान सुमारे 20 अंश आणि आर्द्रता सुमारे 30 टक्के राखली जाते.

या वैज्ञानिक तंत्रज्ञानाद्वारे, संविधानाच्या हस्तलिखित प्रतींचं ऑक्सिडेशन, सूक्ष्मजंतू आणि वायू प्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण केलं जातं.

या पेट्या गेटी कॉन्झर्व्हेशन इन्स्टिट्यूटमध्ये तयार करण्यात आल्या आणि मार्च 1994 मध्ये त्या भारताच्या संसद ग्रंथालयात पोहोचवण्यात आल्या.

संसद ग्रंथालयात सुमारे एक वर्षभर या पेट्यांच्या गुणवत्तेची तपासणीही करण्यात आली. त्यानंतर, 27 ऑक्टोबर 1995 रोजी, संविधानाच्या दोन्ही हस्तलिखित प्रती औपचारिकपणे या पेट्यांमध्ये ठेवण्यात आल्या.

दरवर्षी वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (उरकम) शास्त्रज्ञ या पेट्या तपासतात आणि संविधानाच्या दोन्ही हस्तलिखित प्रतींच्या गुणवत्तेचीही पाहणी करतात.

संपादकीय

रडीचा डाव



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

मोदी विरोधासाठी ह्यअल्गोरिदमह्णचा दिल्ली आंदोलनानंतर पंतप्रधान मोदी यांची विद्यार्थ्यांशी संवाद साधणारी पोस्ट मेटाने काही वेळ दाखवणे थांबवले. पाणी डोक्यावरून गेल्यावर मेटाच्या सर्व मंडळींना बोलावून त्यांच्यापुढे त्यांच्या दुष्कृत्यांचा लेखाजोखा पुराव्यानिशी ठेवला गेला. तेव्हा कुठे या मंडळींनी माफी मागितली.

दिल्ली आंदोलनानंतर पंतप्रधान मोदी यांची विद्यार्थ्यांशी संवाद साधणारी पोस्ट मेटाने काही वेळ दाखवणे थांबवले. पाणी डोक्यावरून गेल्यावर मेटाच्या सर्व मंडळींना बोलावून त्यांच्यापुढे त्यांच्या दुष्कृत्यांचा लेखाजोखा पुराव्यानिशी ठेवला गेला. तेव्हा कुठे या मंडळींनी माफी मागितली.

दिल्लीतील कथित विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रही ढवळून निघाले आहे. या आंदोलनामागचे वेगवेगळे पदर आता समोर येऊ लागले आहेत. हे पदर सामान्य माणसाच्या कल्पनाशक्तीपलीकडचे आहेत. विद्यार्थ्यांना पुढे करून हे आंदोलन पेटविणाऱ्या शक्ती विदेशात बसल्या होत्या. या शक्तींचे आंदोलन पेटविण्याचे मुख्य अस्त्रे होती ती समाजमाध्यमांतील फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲपसारखी लोकप्रिय आणि प्रभावी व्यासपीठे. या तीन व्यासपीठांची भारतातील सर्व थरांतील लोकप्रियता सर्वांनाच ठाऊक आहे. फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲप ही माध्यमे केवळ मनोरंजन या उद्देशाएवढी मर्यादित राहिलेली नाहीत. या माध्यमांनी भारतीयांच्या मेंदूचा ताबा घेतलेला आहे. आपल्या खाण्यापिण्याच्या व अन्य अनेक आवडीनिवडीवर ही माध्यमे प्रभाव टाकत आहेत. अनेकांच्या विचारशक्तीचे अपहरण करून त्यांच्यावर आपली राजकीय मते बिंबवून त्याद्वारे सत्ता परिवर्तन करण्याचा कुटील डाव ह्यफेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲपह्णची मालकी असलेल्या मेटा या कंपनीने प्रचंड आर्थिक गुंतवणुकीच्या मोबदल्यात केला होता, असे आता उघड झाले आहे. याबद्दल केंद्र सरकारने कडक पवित्रा घेतल्यामुळे मेटाचा मालक मार्क झुकरबर्ग याला नाक घासत माफी मागावी लागली आहे. ही लोकप्रिय व्यासपीठे प्रचंड आर्थिक फायद्यात चालली पाहिजेत यासाठी झुकरबर्ग आग्रही असतो. त्यासाठी पैसा मिळवण्याचे ज्ञात, अज्ञात असे सर्व मार्ग तो वापरतो. त्यातूनच प्रेक्षकांच्या अल्गोरिदमचा ताबा मिळवून त्याद्वारे आपल्याला किंवा पैसा मोजणाऱ्या प्रायोजकाला हवा असलेला राजकीय, सांस्कृतिक विचारांचे बीजारोपण करण्याचा धंदा झुकरबर्गने सुरू केला. यात व्यावसायिक नीतिमत्ता वगैरेंचा दुरान्वयेही संबंध नसणार हे उघड आहे. भारतावर नव्हे अनेक देशांवर अशाच कुटील, फसवाफसवी आणि विश्वासघाताच्या मार्गाने शेकडो वर्षे राज्य करणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीचा ह्यमेटाह्ण हा आधुनिक अवतार आहे. जो सामान्य माणूस केवळ करमणुकीसाठी फेसबुक, इन्स्टाचा वापर करीत असतो त्याला आपण कोणत्या चक्रात नकळत अडकत असतो, याची सुतराम कल्पना नसते. केवळ विनोद, चित्रपट गीते, राजकीय विडंबन, पाककृती व अध्यात्म, वैद्यकीय सल्ला, प्राणायाम- योगासने यांचे रील्स बघणे, या संदर्भातले माहितीपर लेख वाचणे यासाठी सर्वसामान्य माणूस फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲपचा वापर करीत असतो. आता माणसं कामधाम सोडून याच व्यासपीठावर आपला मौल्यवान वेळ सतत वाया घालवत असतात ही गोष्ट वेगळी. आता मूळ मुद्दयाला हात घालू. दिल्लीचे आंदोलन हे फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲप या समाजमाध्यमांतून आयोजित केले गेले होते. अधिकाधिक लोक या आंदोलनाविषयी आणि मोदी सरकारविरोधात असलेली माहिती बघतील, वाचतील या उद्देशाने या आंदोलनाच्या बाजूने फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲप या माध्यमांवर पोस्टचा महापूर आला होता. २० जुलै रोजी आंदोलनात घुसलेल्या गुंडांच्या टोळक्यांनी केलेला हिंसाचार लपवण्यासाठी फेसबुक, इन्स्टा आणि व्हॉट्सॲप या तिन्ही माध्यमांवर पोलिसांनी किती निर्दयी पद्धतीने विद्यार्थ्यांवर लाठीमार केला याच्या पोस्ट, रील्स यांचा मारा अखंडपणे चालू होता. सामान्य माणसाला त्यामागचे तर्कशास्त्र कधीच कळणार नाही. मोदी सरकारने न्यायाची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लाठीमार करवला, असा समज जनतेत निर्माण होण्यासाठी मेटाची सारी यंत्रणा कामाला लागली होती. या पोस्टच्या भडिमारामुळे मोदी सरकारला समर्थन करणाऱ्या व्यक्तीलाही आंदोलकांच्या बाजूने सहानुभूती वाटली पाहिजे, असा हेतू ठेवून डिजिटल प्रचार यंत्रणा कामाला लागल्या होत्या. मोदी सरकारचे समर्थन करणाऱ्या पोस्ट कमीत कमी लोकांपर्यंत पोहचतात, अशी तक्रार समाजमाध्यमांवर सक्रिय असणारे अनेक नामवंत करत आहेत. गेल्या ५-६ वर्षांपासून मोदी सरकारचे, भारतीय जनता पक्षाचे समर्थन करणाऱ्या पोस्ट, रील्स समाजमाध्यमांवर कुठेच दिसत नाहीत. २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाने ३०३ जागा जिंकल्या. मोदी सरकार पुन्हा दिमाखात सत्तेवर आले. त्यापूर्वी राहुल गांधींनी राफेल विमान खरेदीप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आरोप केले होते. त्या आरोपांना समाजमाध्यमांवर तुफान प्रसिद्धी मिळाली. मात्र राफेल प्रकरणात कसलाच गैरव्यवहार झालेला नाही, राहुल गांधींचे आरोप तद्दन खोटे आहेत हे दाखविणाऱ्या माहितीपूर्ण पोस्ट समाजमाध्यमांवर अपवादानेच दिसायच्या. राहुल गांधींना आपले आरोप खोटे असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात माफी मागावी लागली, ही गोष्ट वेगळी. २०२० मध्ये मोदी सरकारने नागरिकत्व सुधारणा कायदा अंमलात आणल्यानंतर समाजमाध्यमांवर हा कायदा देशातील मुस्लिमांच्या कसा विरोधात आहे, अनेक वर्षे देशात राहणाऱ्या मुस्लिमांना भारताबाहेर हाकलून देणार अशा पद्धतीचा प्रचार करणाऱ्या पोस्टचा पूर फेसबुकवर व अन्य समाजमाध्यमांवर वहात होता.



२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी सरकार संविधान बदलणार या पद्धतीचा तुफानी प्रचार समाजमाध्यमांवर झाला. दिल्ली आंदोलनानंतर पंतप्रधान मोदी यांची विद्यार्थ्यांशी संवाद साधणारी पोस्ट मेटाने काही वेळ दाखवणे थांबवले. पाणी डोक्यावरून जाते आहे हे दिसल्यावर मेटाच्या सर्व मंडळींना बोलावून त्यांच्यापुढे त्यांच्या दुष्कृत्यांचा लेखाजोखा पुराव्यानिशी ठेवला गेला. तेव्हा कुठे या मंडळींनी माफी मागितली. मोदी विरोधासाठी आंतरराष्ट्रीय शक्ती कोणत्या थराला जातात हे आता दिसले आहे. समाजमाध्यमांवरील लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेण्याचाच हा प्रकार आहे.

परकीय निधी विरुद्ध परकीय प्रभाव

एफसीआरए कायद्यातील सुधारणांचे विधेयक काल संयुक्त संसदीय समितीकडे वर्ग करण्यात आले. पण, गेले काही दिवस एफसीआरए कायदा आणि त्यातील प्रस्तावित सुधारणांवरुन विरोधकांनी मोठा अपप्रचार केला. परंतु, या कायद्याचा उद्देश वैध परकीय मदतीला रोखणे नसून, निधीचा स्त्रोत, वापर, पारदर्शकता आणि राष्ट्रीय हित यांच्यात योग्य समतोल राखणे हा आहे. त्यामुळे एफसीआरएकडे कोणत्याही धर्म किंवा संस्थेविरोधातील कारवाई म्हणून नव्हे; तर भारताच्या सार्वभौमत्वाचे, कायद्याचे आणि सार्वजनिक हिताचे संरक्षण करणारी नियामक व्यवस्था म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. भारतामध्ये परकीय निधीच्या प्रवेशाबाबत आणि त्याच्या वापराबाबतची चर्चा काही नवीन नाही. दीर्घकाळापासून परकीय मदतीच्या माध्यमातून चालणाऱ्या अनेक संस्था देशात शिक्षण, आरोग्य, आपत्ती निवारण, सामाजिक सेवा, धार्मिक उपक्रम आणि संशोधन अशा विविध महत्त्वपूर्ण क्षेत्रांत कार्यरत आहेत. अशा सर्व वैध आणि पारदर्शक कामांचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, प्रश्न तेव्हा निर्माण होतो, जेव्हा परकीय निधीचा वापर घोषित उद्दिष्टांपासून दूर जाऊन राजकीय प्रभाव निर्माण करण्यासाठी, सामाजिक अस्थिरता वाढवण्यासाठी, धर्मांतरासाठी, बेकायदेशीर कारवायांसाठी किंवा भारताच्या हिताच्या विरोधात होणाऱ्या कामांसाठी केला जातो. याच मूलभूत चिंतेचा विचार करून परकीय योगदान (नियमन) अधिनियम अर्थात, फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट (एफसीआरए) लागू करण्यात आला. हा कायदा पहिल्यांदा आणीबाणीच्या काळात म्हणजेच, १९७६ मध्ये करण्यात आला. त्यामागील प्रमुख उद्देश त्याकाळात परकीय निधी आणि राजकीय हालचालींवर लक्ष ठेवणे हा होता. त्यानंतर २०१० मध्ये जुन्या कायद्यात बदल करून अधिक कठोर स्वरूपाचा एफसीआरए, २०१० कायदा करण्यात आला. हा कायदा दि. १ मे २०११ पासून लागू झाला. या परकीय योगदान (नियमन) अधिनियमाचा उद्देश परकीय निधीवर पूर्णपणे बंदी घालणे हा नाही. भारतात येणारा परकीय निधी पारदर्शक पद्धतीने प्राप्त व्हावा आणि ज्या उद्देशासाठी त्याला परवानगी देण्यात आली आहे, त्याच उद्देशासाठी त्याचा वापर व्हावा, हे सुनिश्चित करणे हा या कायद्याचा मुख्य हेतू आहे. प्रस्तावित कायद्याच्या विधेयकातील एक महत्त्वाची तरतूद अशा संस्थांच्या परकीय निधीतून निर्माण झालेल्या मालमत्ता आणि परकीय अंशदानाबाबतची व्यवस्था करण्याशी संबंधित आहे, ज्यांचे ह्यएफसीआरएह्ण प्रमाणपत्र रद्द झाले आहे, संस्थेने स्वतःहून ते परत केले आहे किंवा त्याचे नूतनीकरण झालेले नाही, यासाठी निर्दिष्ट प्राधिकारी नियुक्त करण्याची व्यवस्था प्रस्तावित आहे. अशा परिस्थितीत संबंधित मालमत्तेचा तात्पुरता ताबा घेणे, तिचे व्यवस्थापन करणे आणि पुढील कार्यवाहीची व्यवस्था पाहणे, ही जबाबदारी या प्राधिकरणाकडे असेल. जर संबंधित संस्था निर्धारित प्रक्रियेनुसार आपले एफसीआरए नोंदणी प्रमाणपत्र पुन्हा बहाल करून घेण्यात यशस्वी ठरली, तर मालमत्ता आणि वापरात न आलेला परकीय निधी पुन्हा संस्थेला परत करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. विधेयकात अशीही तरतूद करण्यात आली आहे की, जर या मालमत्तांमध्ये धर्मस्थळांचा समावेश असेल, तर तेथील धार्मिक कार्यकलाप पूर्वीप्रमाणेच सुरू ठेवले जातील. विधेयकातील आणखी एक महत्त्वपूर्ण बदल दंडात्मक तरतुदींशी संबंधित आहे. सध्या असलेल्या कमाल पाच वर्षांच्या शिक्षेऐवजी ती शिक्षा एक वर्ष करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच निर्दिष्ट प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध पुनरीक्षण आणि न्यायालयीन अपील करण्याची प्रक्रियाही प्रस्तावित करण्यात आली आहे.अर्थात, या विधेयकाकडे केवळ ह्यपरकीय संस्थांवर करण्यात येणारी कारवाईह्ण या दृष्टिकोनातून पाहणे अपूर्ण ठरेल. खरा मुद्दा आहे, तो परकीय निधीच्या वापरातील उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि राष्ट्रीय हिताचे संरक्षण यांचा. परकीय निधीवर देखरेख का आवश्यक? कोणत्याही सार्वभौम राष्ट्रासाठी आपल्या देशात येणाऱ्या परकीय निधीच्या स्रोतांवर आणि त्याच्या वापरावर देखरेख ठेवणे, ही एक सामान्य बाब. भारत हा असा करणारा एकमेव देश नाही. अमेरिकेसह अनेक देशांमध्ये परकीय निधी, परकीय एजंट, परकीय संस्था आणि राजकीय प्रभावाशी संबंधित स्वतंत्र कायदे व व्यवस्था आहेत. त्यामुळे भारताने आपल्या देशातील परकीय अंशदानासाठी नियमन निश्चित करणे म्हणजे, एखाद्या धर्माच्या किंवा समुदायाच्या विरोधात केलेली कारवाई आहे, असे म्हणणे तथ्यात्मकदृष्ट्या योग्य ठरणार नाही. कायद्यात दुरुस्ती होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी १९८४, २०१०, २०१६, २०१८, २०२० आणि २०२२ मध्येही कायद्यात विविध दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, २०१० मध्ये जुन्या कायद्याला पूर्णपणे रद्द करून त्याऐवजी अधिक कठोर स्वरूपाचा नवा कायदा करण्यात आला. आकडेवारीवरूनही ही समस्या काल्पनिक नसल्याचे दिसून येते. गृहमंत्रालयाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, २०१६ ते २०२० या कालावधीत ६ हजार, ६००हून अधिक स्वयंसेवी संस्थांची (एनजीओ) एफसीआरए नोंदणी रद्द करण्यात आली होती. आणखी एका आकडेवारीनुसार, परकीय निधीतून चालणाऱ्या एकूण ५२ हजार, १५६ एनजीओ आणि संस्थांपैकी सध्या केवळ १४ हजार, ४३५ संस्था सक्रिय आहेत. २२ हजार, ४९६ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे, तर १५ हजार, २२५ संस्था पूर्णपणे निष्क्रिय आहेत. नियमानुसार, एफसीआरए नोंदणी रद्द झाल्यानंतर अशा संस्थांना एफसीआरए अंतर्गत परकीय अंशदान स्वीकारता किंवा वापरता येत नाही. ग्रीनपीस इंडियावर २०१५ मध्ये एफसीआरए नियमांचे उल्लंघन केल्याचे अनेक आरोप झाले. यामध्ये परकीय अंशदानासाठी निर्धारित केलेल्या बँक खात्याबाहेर व्यवहार करणे, मिळालेल्या अंशदानाची चुकीची किंवा कमी नोंद करणे, प्रशासकीय खर्चासाठी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक खर्च करणे, ह्यपरकीय एनजीओह्णकडून ह्यभारतीय एनजीओह्ण किंवा कार्यकर्त्यांच्या कायदेशीर खर्चासाठी मदत मिळवणे, तसेच इतर अनुपालनाशी संबंधित मुद्दयांचा समावेश होता. गृहमंत्रालयाने चौकशी केल्यानंतर त्याची नोंदणी निलंबित केली आणि पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू केली. त्याचप्रमाणे, २०२५ मध्ये लडाखमधील ह्यस्टुडंट्स एज्युकेशन ॲण्ड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाखह्ण या संस्थेचा ह्यएफसीआरएह्ण परवानादेखील गृहमंत्रालयाने रद्द केला होता. मात्र, परकीय निधी स्वीकारणारी प्रत्येक संस्था संशयास्पद असते, असेही समजणे योग्य नाही. भारतात अनेक संस्था परकीय मदतीच्या माध्यमातून रुग्णालये, शाळा, अनाथालये, आपत्ती निवारण, ग्रामीण विकास, संशोधन, शिक्षण, आरोग्यसेवा आणि इतर सामाजिक कार्ये करतात. ह्यएफसीआरएह्णचा उद्देश अशा वैध उपक्रमांना संपुष्टात आणणे नसून, त्यांचे संरक्षण करणे हा आहे. सरकारचा उद्देश असा आहे की, वैध परकीय मदतीचे स्वागत केले जाईल. मात्र, परकीय निधीचा गैरवापर कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. ख्रिश्चन संस्थांकडून एवढा संभ्रम आणि विरोध का? अधिनियमात होत असलेल्या दुरुस्तीवरून सर्वाधिक राजकीय वाद निर्माण करण्याचा प्रयत्न या मुद्दयावर केला जात आहे की, याचे लक्ष्य चर्च किंवा ख्रिश्चन संस्था आहेत. प्रत्यक्षात ह्यएफसीआरएह्णची रचना ना कोणत्याही एका धर्मासाठी करण्यात आली आहे, ना त्यात कोणत्याही विशिष्ट धर्माचा उल्लेख आहे. मात्र, धार्मिक कार्यांशी संबंधित संस्थांनाही कायद्यात निश्चित केलेल्या अटींचे पालन केल्यासच परकीय अंशदान स्वीकारता येते. तथापि, अनेक प्रकरणांमध्ये चर्च आणि त्यांच्याशी संबंधित विविध संस्थांकडून परकीय निधीचा गैरवापर करून बेकायदेशीर पद्धतीने धर्मांतर कशाप्रकारे केले जात होते, हा विषयही कोणापासून लपून राहिलेला नाही. कदाचित म्हणूनच, ज्यांना कारवाईला सामोरे जाण्याची भीती आहे, त्यांच्याच मनात आज भीती निर्माण झाली आहे! आपल्या देशात एखादी संस्था प्रामाणिकपणे धार्मिक, शैक्षणिक किंवा सामाजिक सेवा करत असेल आणि परकीय निधीचा कायदेशीर पद्धतीने वापर करत असेल, तर केवळ परकीय मदत स्वीकारते म्हणून तिच्याकडे संशयाने पाहिले जात नाही. उलट, अशा संस्थांचा सार्वजनिक स्तरावर सन्मानच केला जातो. मात्र, हेही स्पष्ट असले पाहिजे की, एखाद्याची धार्मिक ओळख त्या संस्थेला भारतीय कायद्यापेक्षा वरचे स्थान देऊ शकत नाही. जर आपण योग्य मार्गावर असू, तर मग कायद्याला विरोध का? आणि त्याला घाबरण्याचे किंवा इतरांना घाबरवण्याचे हे प्रयत्न कशासाठी? खरी चर्चा परकीय निधी रोखण्याची किंवा त्याला परवानगी देण्याची नाही, तर त्या निधीच्या माध्यमातून निर्माण होणारा परकीय प्रभाव समजून घेण्याची आहे. परदेशातून आलेला पैसा एखाद्या रुग्णालयात रुग्णाच्या उपचारासाठी वापरला जात असेल, एखाद्या गरीब मुलाच्या शिक्षणासाठी खर्च होत असेल, नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतकार्यांसाठी उपयोगात येत असेल किंवा वैज्ञानिक संशोधनासाठी वापरला जात असेल, तर तो मानवकल्याणाचे माध्यम ठरू शकतो. मात्र, हाच पैसा देशातील भोळ्याभाबड्या लोकांचे बेकायदेशीर धर्मांतर करण्यासाठी, सामाजिक रचनेवर प्रभाव टाकण्यासाठी, राजकीय वातावरणाला दिशा देण्यासाठी, हिंसक किंवा विघटनकारी कारवायांना प्रोत्साहन देण्यासाठी अथवा देशातील कायदे मोडण्यासाठी वापरला जात असेल, तर तो निश्चितच अस्वीकार्य आहे. स्मरणात ठेवावे की, देशांतर्गत आणि काही परकीय शक्तींनी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या (सीएए) विरोधात ज्याप्रकारे संभ्रम आणि अपप्रचार पसरवला, त्याचप्रमाणे आज काही संस्था भारतविरोधी स्वरूपाच्या खोट्या मोहिमा चालवत आहेत. त्यामुळेदेशाने अशा प्रकारच्या प्रयत्नांपासून सावध राहणे आवश्यक आहे.

25 वर्षे विकासाची 25 मिरा भाईंदर महानगरपालिका "माझे शहर, माझा अभिमान"

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

Garden Department

2nd Floor, Ward Committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia.

Miraroad (East), Tal. Dist. – Thane. 401107 Tel. No. 28103409

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

जा.क्र. मनपा/उद्यान /८३४/२०२६-२७ **दिनांक : १७/०८/२०२६**

//TENDER NOTICE //

Mira Bhaindar Municipal Corporation Garden Department invites sealed tender form for following work in two envelope system at the day 25/08/2026 up to 1.00 pm. The tender form and other relevant document will be available for download on **https://mahatenders.gov.in** from the date 18/08/2026 to 25/08/2026 till 1.00 pm. The tender shall be opened in the presence of the bidders or their representatives on the day 27/08/2026 at 01.00 Pm at the tender cell of Mira Bhaindar Municipal Corporation.

Name of work	Estimate Cost	Earnest Money Deposit (EMD)	Cost of tender documents
Execution of civil works at Ramdev Park Garden, Mira Road (East), within the jurisdiction of the Mira Bhayandar Municipal Corporation	Rs. 5,73,902/- (Rs. Five Lakh Seventy Three Thousand Nine Hundred Two Only)	Rs. 5,739/- (Rs. Five Thousand Seven Hundred Thirty Nine Only)	Rs. 500+90 (GST) = 590/- (Rs. Five Hundred Ninety Only) Non Refundable

NOTE :-

1) Tender form should be submitted through Online System in two Envelope.
2) Tender form fee not refundable.
3) Hon. Commissioner of Mira Bhaindar Municipal Corporation has reserved Right to reject any or all bids, without assigning any reasons.
4) The Period of tender law admissibility is 120 days.

Ref. No. : MBMC/PRO/Ad./E-9593479/2026-27
Date : 17/08/2026

Sign
(Kavita Borkar)
Dy Commissioner (Garden)
Mira Bhaindar Municipal Corporation

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६ ते २४ ऑगस्ट २०२६

सीबीआयची नीट पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई

एनटीएच्या 3 तज्ज्ञांविरुद्ध आरोपपत्र दाखल, तपासात काय आढळलं?



नवी दिल्ली, 'नीट पेपरफुटीमागे राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) तीन तज्ज्ञांचा हात आहे', असा ठपका केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) न्यायालयात सादर केलेल्या आरोपपत्रामध्ये ठेवला आहे. 'एनटीए'च्या गोपनीय विभागात अंगझडती आणि तपासणीचा अभाव, तेथील सीसीटीव्हीच्या देखरेखीमधील त्रुटी आणि प्रश्नपत्रिकेस अंतिम स्वरूप देण्यासंबंधीच्या वेगवेगळ्या टप्प्यांत त्याच-त्याच तज्ज्ञांचा असणारा सहभाग' याकडे लक्ष वेधत सीबीआयने पेपरसुरक्षेतील भगदाड अधोरेखित केले आहे. पेपरफुटी तसेच, सार्वजनिक परीक्षांमध्ये इतर अनुचित मार्गांचा वापर यांमधून उद्भवणाऱ्या फौजदारी प्रकरणांची सुनावणी करणाऱ्या जलदगती न्यायालयासमोर सीबीआयने अलीकडेच आपला अंतिम अहवाल सादर केला. 'पी. व्ही. कुलकर्णी (रसायनशास्त्र), मनीषा संजय हवालदार (भौतिकशास्त्र) आणि मनीषा गुरुनाथ मांढरे (वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र) हे तिघे या पेपरफुटीचा मुख्य स्रोत आहेत', असे सीबीआयच्या या ९४ पानी आरोपपत्रात म्हटले आहे. 'एनटीएच्या कार्यपद्धतीत विभागीकरणाचा गंभीर अभाव आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट'च्या प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रत्येक टप्प्यावर व अखेरपर्यंत प्रवेश मिळू शकतो. या कार्यपद्धतीत प्रश्न तयार करणे, नियंत्रण, तपासणी/पडताळणी आणि भाषांतर हे चार टप्पे आहेत. पहिल्या, म्हणजे प्रश्न तयार करण्याच्या टप्प्यावर, तज्ज्ञांना प्रश्न आणि उत्तरे देण्यासाठी बोलावले जाते. मात्र, त्यांनी सुचवलेल्या प्रश्नांचा अंतिम प्रश्नपत्रिकेत समावेश होईल की नाही, हे त्यांना माहीत नसते. यातील प्रत्येक टप्पा वेगवेगळ्या तज्ज्ञांकडून हाताळला जायला हवा, जेणेकरून कोणत्याही एका व्यक्तीला परीक्षेच्या संपूर्ण स्वरूपाची माहिती मिळू नये', असे अधिकाऱ्यांनी सांगितले. 'मात्र नीट यूजी २०२६ परीक्षेसाठीच्या प्रक्रियेत अनेक तज्ज्ञ अनेक टप्प्यांमध्ये सहभागी असल्याचे आढळले आहे', असेही हे अधिकारी म्हणाले. 'राष्ट्रीय राजधानीतील 'एनटीए' कार्यालयात सीसीटीव्हीचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष नसल्याने या तज्ज्ञांकडून झालेला हा प्रकार लक्षात आला नाही', असे सीबीआयचे म्हणणे आहे. सीबीआयचे आरोपपत्र मोठ्या प्रमाणातील डिजिटल न्यायवैद्यक पुराव्यांवर आधारित आहे. यात पुण्यातील एका गृहनिर्माण सोसायटीच्या ॲक्सेस कंट्रोल ॲपचाही समावेश आहे. या प्रकरणातील एक आरोपी पी. व्ही. कुलकर्णी तेथे वास्तव्यास आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. विशेष सीबीआय न्यायालयात एकूण १३ आरोपींविरोधात दाखल केलेल्या आरोपपत्रात तपास यंत्रणेने कुलकर्णी याच्या सोसायटीच्या ॲपच्या नोंदींचा उल्लेख केला आहे. तज्ज्ञांकडून मध्यस्थांपर्यंत 'हे प्रश्न या तज्ज्ञांकडून मध्यस्थ आणि सहायक यांच्यापर्यंत सहज पोहोचल्याचे दिसून आले. तेजस हर्षदकुमार शहा, डॉ. मनोज भगवानराव शिरुरे, शिवराज मोटेगावकर, धनंजय निवृत्ती लोखंडे आणि शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांच्याकडे हे प्रश्न पोहोचवण्यात आले.

आरोपींचा सहभाग काय?

- पी. व्ही. कुलकर्णी : छोट्या चिठ्ठ्यांवर थोडक्यात प्रश्न लिहून 'एनटीए 'बाहेर नेले. हॉटेलमध्ये परतल्यानंतरही प्रश्न लिहून काढले.
- मनीषा मांढरे : दिवसभराचे काम पूर्ण करून हॉटेलच्या खोलीत परतल्यानंतर एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांतील संबंधित परिच्छेद चिन्हांकित करत असे.
- मनीषा हवालदार: दिवसभराचे काम संपल्यानंतर दिल्लीतील निवासस्थानी परतल्यावर प्रश्न थोडक्यात लिहून ठेवत असे.
- मनीषा वाघमारे : आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात प्रश्नांच्या फुटीतील आणि वितरणातील प्रमुख सूत्रधारांपैकी एक. उमेदवार व विषयतज्ज्ञांतील दुवा.
- शुभम खैरनार : फुटलेल्या रसायनशास्त्राचे प्रश्न पुरवण्यासाठी समन्वय

राज्यात ३० हजारांहून अधिक शिक्षकांची भरती सुरू

शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांची माहिती



नवी दिल्ली। राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील रिक्त ३० हजार २०९ शिक्षण सेवक तसेच शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांनी गुरुवारी दिली.

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील रिक्त ३० हजार २०९ शिक्षण सेवक तसेच शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांनी गुरुवारी दिली.

शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी) -२०२५ ऑनलाइन पद्धतीने २७ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत घेण्यात आली होती. या चाचणीसाठी २ लाख २८ हजार ८०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवार चाचणीस प्रविष्ट झाले असून १ लाख ७० हजार १०८ उमेदवारांनी स्वप्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली आहे.

पवित्र पोर्टलवरील जाहिरात प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदांच्या १३ हजार ३५१, महानगरपालिकांच्या १ हजार ९५४, नगर पालिका/परिषदांच्या २८० तसेच खासगी शैक्षणिक संस्थांच्या १२ हजार १४८, याशिवाय आदिवासी विकास विभागाच्या शासकीय शाळांमधील २ हजार ४२१ आणि शासकीय विद्यानिकेतन मधील ५६ अशा एकूण ३० हजार २०९ रिक्त पदांची भरती मागणी नोंदविण्यात आली आहे. यामधील १९ हजार ८८१ पदे मुलाखतीशिवाय तर खासगी संस्थांमधील १० हजार ३२८ पदे मुलाखतीसह भरावयाची आहेत, असे सिंह यांनी सांगितले.

या पदांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या १४ हजार ३२० पदांचा, इयत्ता सहावी ते आठवीच्या १० हजार १२ पदांचा, इयत्ता नववी आणि दहावीच्या ५ हजार ५१३ पदांचा तर इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या ३६४ पदांचा समावेश आहे.

उमेदवारांना पदभरतीसाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यासाठी आवश्यक सुविधा ६ ऑगस्ट २०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांनी पदनिहाय पसंतीक्रम नोंदवून तो ११ ऑगस्ट २०२६ पर्यंत लॉक करणे आवश्यक आहे. त्यानंतर मुलाखतीशिवायच्या पदांसाठी गुणवत्तायादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही सिंह यांनी स्पष्ट केले.

मणिपूरमध्ये सुरक्षा यंत्रणांची मोठी कारवाई

2 बंदी घातलेल्या संघटनांच्या 4 दहशतवाद्यांना अटक

मणिपूर। मणिपूरमध्ये सुरक्षा यंत्रणांनी मोठी कारवाई करत दोन बंदी घातलेल्या बंडखोर संघटनांशी संबंधित चार संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. खंडणी वसुलीच्या कथित प्रकरणात या चौघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. पोलिसांच्या निवेदनानुसार, ही कारवाई शुक्रवारी करण्यात आली. अटक करण्यात आलेल्यांपैकी तिघांचा संबंध बंदी घातलेल्या SOREPA संघटनेशी, तर एकाचा संबंध People's Liberation Army या बंडखोर संघटनेशी असल्याचे पोलिसांनी सांगितले. **SOREPAच्या तीन कॅडरना अटक :** काकचिंग जिल्ह्यातील वायखोंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काकचिंग खुनौ उमातेल अवांग लीकाई परिसरातून SOREPAच्या दोन कॅडरना त्यांच्या राहत्या ठिकाणाहून अटक करण्यात आली. पोलिसांनी त्यांची ओळख २५ वर्षीय मायांगलंबम निमाईचंद आणि २७ वर्षीय मायांगलंबम खोइराबा अशी केली आहे. यानंतर इंफाळ पूर्व जिल्ह्यातील चेकॉन परिसरातून SOREPAच्या आणखी एका कॅडरला अटक करण्यात आली. त्याचे नाव ५२ वर्षीय मोहम्मद मजहर अली असल्याचे पोलिसांनी सांगितले. **PLAच्या कॅडरलाही अटक :** इंफाळ पूर्व जिल्ह्यातील सेईजांग अवांग परिसरात सुरक्षा यंत्रणांनी PLAशी संबंधित एका २५ वर्षीय कॅडरला अटक केली. त्याची ओळख फेइरोजाम करणजॉय सिंह अशी करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याच्या घरातून एक हँड ग्रेनेड, INSAS रायफलची एक रिकामी मॅगझिन आणि रायफलच्या तीन रिकाम्या काडतुसांचे खोके जप्त करण्यात आले आहेत. **खंडणी वसुलीचा आरोप :** अटक करण्यात आलेल्या चौघांवर खंडणी वसुलीमध्ये सहभाग असल्याचा आरोप आहे. मणिपूरमध्ये विविध बंडखोर संघटनांकडून नागरिक, व्यापारी आणि व्यावसायिकांकडून खंडणी मागितल्याच्या घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. या कारवाईनंतर पोलिसांकडून आरोपींची चौकशी सुरू असून, त्यांचा आणखी कोणत्या घटनांशी किंवा व्यक्तींशी संबंध आहे का, याचा तपास केला जात आहे. **सुरक्षा यंत्रणा सतर्क :** मणिपूरच्या इंफाळ खोऱ्यात सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आणि इतर सुरक्षा यंत्रणांकडून बंडखोर संघटनांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या वस्तूंच्या आधारेही पुढील तपास केला जाणार आहे. चारही आरोपींविरोधातील आरोप तपासाचा भाग असून, त्यांच्यावरील आरोप न्यायालयीन प्रक्रियेत सिद्ध होणे बाकी आहे.



'पादचारी प्रथम' या अभियानांतर्गत प्रशासनाचा इशारा

पदपथांच्या पाहणीत हयगय झाल्यास अभियंते जबाबदार

मुंबई, 'पादचारी प्रथम' या अभियानांतर्गत मुंबईतील फुटपाथ अतिक्रमणमुक्त करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत प्रत्येक विभागातील किमान १० टक्के पदपथांची दर महिन्याला पाहणी करावी. मंजूर आराखड्यानुसार कोणतीही तफावत आढळल्यास निर्धारित मानकांचे पालन करण्यात अपयश आले तर संबंधित रस्ते अभियंता, सहाय्यक अभियंता (परिरक्षण) आणि विभागीय कार्यकारी अभियंते जबाबदार असतील, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. पादचारी प्रथम अभियानांतर्गत मुंबई महापालिकेने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. मुंबई शहर हे पायी प्रवास करण्यावर भर देणारे असून ५० टक्के मुंबईकरांचा प्रवास पायीच होतो. त्यामुळे फुटपाथ पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व मोकळे ठेवणे पालिकेची जबाबदारी आहे. 'पादचारी प्रथम' या अभियानांतर्गत मुंबईतील पदपथ अतिक्रमण मुक्त करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. महापालिकेच्या ६ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रत्येक विभागातील किमान १० टक्के पदपथांची दर महिन्याला पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या पाहणीत पदपथ मंजूर आराखडा, रचना मानके आणि देखभालीच्या आवश्यकतांनुसार आहेत की नाही, याची तपासणी केली जाणार आहे. मंजूर आराखड्यानुसार तफावत आढळल्यास अभियंत्यांवर सुधारात्मक कारवाईची जबाबदारी निश्चित केली जाईल.

आयुक्तांकडून दर महिन्याला झाडाझडती

सर्व विभागांच्या कामगिरीचा आढावा महापालिका आयुक्तांच्या मासिक आढावा बैठकीत घेण्यात येईल.

...तर अधिकाऱ्यांवर कारवाई करणार

पदपथांची अवस्था सुधारण्यासाठी आता केवळ कारवाई न करता नियमित पाहणी आणि जबाबदारी निश्चित करण्याची यंत्रणा उभी करण्यात आली आहे. त्यामुळे पदपथांच्या देखभालीत हलगर्जी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

सहाय्यक आयुक्तांनीही नियमित पाहणी करावी

सहाय्यक आयुक्तांनी आपल्या विभागातील पदपथांची नियमित पाहणी करून ते अतिक्रमण आणि अन्य अडथळ्यांपासून मुक्त राहतील, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक विभागाने पदपथाच्या पाहणी व कारवाईचा साप्ताहिक अहवाल सादर करायचा असून त्यामध्ये पदपथाचे नाव, कारवाईची तारीख, केलेल्या कारवाईचे स्वरूप तसेच कारवाईपूर्वी आणि कारवाईनंतरची छायाचित्रे देणे आवश्यक आहे.



सर्व प्रकारची अतिक्रमणे हटविणार

पदपथांवरील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, अनावश्यक स्ट्रीट फर्निचर, बेवारस साहित्य, जाहिरात फलक, बॅनर तसेच बांधकामाचा राडारोडा हटवण्यावरही या मोहिमेत भर देण्यात आला आहे. रेल्वे, मेट्रो स्थानके, शाळा, कॉलेज, रुग्णालये अन्य वैद्यकीय सुविधा, पालिका व शासकीय कार्यालये, धार्मिक स्थळे या ठिकाणच्या पदपथांना प्राधान्यक्रम दिला आहे. प्राधान्यक्रमातील पदपथांची अतिक्रमणमुक्तीची कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश आहेत. या गोष्टींची अंमलबजावणी करा!

सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या विभागातील पदपथांची नियमित पाहणी करून सदर पदपथ अतिक्रमण व इतर अडथळ्यांपासून मुक्त राहतील, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. प्रत्येक विभागाने साप्ताहिक अहवाल सादर करावा, परिमंडळातील उप आयुक्तांनी साप्ताहिक आढावा घेऊन संबंधित विभागांकडून सादर करण्यात आलेल्या अहवालांची पडताळणी करावी, अतिरिक्त आयुक्तांनी अंमलबजावणीच्या प्रगतीचा दर पंधरवड्याला आढावा घ्यावा.

खडकपाडा पोलिसांची मोठी कामगिरी! सराईत दुचाकी चोर अटकेत



कल्याण। खडकपाडा पोलिसांनी दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत सराईत आरोपी अब्बास शाहजोर सय्यद (वय २५, रा. आंबिवली, कल्याण) याला अटक केली. आरोपीकडून चोरीच्या ९ मोटारसायकली व स्कुटी, असा ₹६.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, कल्याण, ठाणे शहर आणि मुरबाड परिसरातील ८ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. खडकपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडवली रोड, गांधारी येथून ४ ऑगस्ट रोजी होंडा सीबी शाईन मोटारसायकल चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीची ओळख पटवली. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. न्यायालयाने आरोपीला ७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी चौकशीदरम्यान आरोपीकडून विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरी केलेल्या आणखी आठ दुचाकी जप्त केल्या. यात सुझुकी बर्गमन, ॲक्सेस, टीव्हीएस एनटॉर्क, अपाची तसेच होंडा सीबी शाईन अशा वाहनांचा समावेश आहे. तपासात आरोपीविरुद्ध खडकपाडा, डोंबिवली, विष्णुनगर, मुंब्रा, महात्मा फुले चौक, कळवा, अंबरनाथ आणि मुरबाड पोलीस ठाण्यांतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले. तसेच कापूरबावडी आणि बदलापूर पोलीस ठाण्यांतील जबरी चोरीच्या गुन्ह्यांमध्येही तो फरार असल्याचे समोर आले आहे. याशिवाय आरोपीविरुद्ध यापूर्वी मुंबईतील सांताक्रूझ, खडकपाडा, डोंबिवली आणि कापूरबावडी पोलीस ठाण्यांत चोरी, सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला आणि अमली पदार्थांशी संबंधित गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) संजय जाधव, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र खेडकर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com